सतात्काळ

अ.शा.पत्र क्र. पीएचसी २००२/८१८/प्र.क्र.२७०/०२/आ.५,
**सार्वजनिक आरोग्य विभाग,**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २/१२/२००३.

प्र.क.प्रधान
उपसचिव

**विषय :-** ग्रामीण रुग्णालयाच्या ठिकाणी कार्यरत असणा-या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या स्थलांतराबाबत मार्गदर्शक सूचना.

**संदर्भ :** (१) शा.नि.सा.आ.वि. क्र.पीएचसी १०९४/४११९/प्र.क्र.१३/९५/ आ.४, दि. १/१/१९९६.
(२) शा.नि.सा.आ.वि.क्र.पीएचसी १०९७/२८६/प्र.क्र.२६/आ.४, दि.२६/१२/१९९७.
(३) आपले पत्र क्र. संआसे/निविमू/प्राआके/स्थलांतर/टे.१/कक्ष ७/२००० दि. ३१ जुलै, २०००.
(४) शासन अ.शा. पत्र क्र. पीएचसी १०९७/२८६/प्र.क्र.२६, दि. ६ ऑगस्ट, २००२.
(५) शासन पत्र क्र.पीएचसी १०००/प्र.क्र.५३९/आ.५, दि. २७/१०/०३.

प्रिय डॉ.

प्राथमिक आरोग्य केंद्राच्या स्थापनेबाबत शासन निर्णय सा.आ.विभाग, दि.१ जानेवारी १९९६ आणि दि. २६/१२/९७ अन्वये अनुक्रमे संख्यात्मक व स्थान निर्देशित केलेला बृहत आराखडा मंजूर करण्यात आला आहे. या अंतर्गत नवीन ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करणे, आणि ज्या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रे श्रेणीवर्धित करुन ग्रामीण रुग्णालये स्थापन करण्यांत आली आहेत त्या ठिकाणची प्राथमिक आरोग्य केंद्रे इतरत्र स्थलांतरीत करण्याबाबत स्थान निश्चिती देखील अंतर्भूत आहे.

या बृहत आराखडयामध्ये १०५ ठिकाणी नव्याने ग्रामीण रुग्णालये स्थापन करण्याबाबत स्थान निश्चिती करण्यांत आली आहे व यापैकी शासनाने शासन निर्णय सा.आ.वि.क्र.संकिर्ण-१००३/प्र.क्र.१०७ /२००१ /आ४ दि.१४/८/०३ च्या अन्वये स्थापन करण्यांत आलेली ३० ग्रामीण रुग्णालये व शासन निर्णय



Scanned with CamScanner

क्र.सा.आ.वि.क्र.आरएलएच-१२९९/१५०१/प्र.क्र.६२७/आ-४,दि.१०/१०/०३ अन्वये स्थापन करण्यात आलेले सोनगीर जि.धुळे येथील ग्रामीण रुग्णालय अशी एकूण ३१ ग्रामीण रुग्णालये धरुन ८६ ग्रामीण रुग्णालयांच्या स्थापनेस मंजूरी देण्यात आली आहे आणि १९ ग्रामीण रुग्णालयाची स्थापना व्हावयाची आहे. या १०५ ग्रामीण रुग्णालयांपैकी ६२ ठिकाणी प्रा.आ.केंद्रे देखील कार्यरत आहेत आणि त्यांच्या स्थलांतराबाबत बृहत आराखडयात निर्णय झालेला नाही.

ग्रामीण रुग्णालये अस्तित्वात असलेल्या ठिकाणची प्राथमिक आरोग्य केंद्रे इतरत्र स्थलांतरीत करण्याबाबत लोकप्रतिनिधींच्या मागण्या वेळोवेळी प्राप्त होत आहेत. त्यामुळे बृहत आराखडयात समाविष्ट असलेल्या १०५ ग्रामीण रुग्णालयाच्या ठिकाणापैकी ज्या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यरत आहेत तसेच अन्य ग्रामिण रुग्णालयांच्या ठिकाणी अजूनही प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यरत असल्यास अशी केंद्रे इतरत्र स्थलांतरीत करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार दि.१/१/९६ च्या शासन निर्णयासोबत असणा-या प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापनेच्या मार्गदर्शक तत्वां व्यतिरीक्त अन्य सूचना समाविष्ट करुन नव्याने स्थापन करण्यांत यावयाच्या किंवा स्थलांतराने स्थापन करण्यांत येणा-या प्राथमिक आरोग्य केंद्राबाबत धोरणात्मक निर्णयानुसार सोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" प्रमाणे मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यांत येत आहेत. यास अनुलक्षून आपल्या संदर्भाधीन पत्रात नमूद केलेल्या ६२ ठिकाणच्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या तसेच या व्यतिरिक्त अन्य प्रकरणे असल्यास त्यांच्या स्थलांतराबाबतचा प्रस्ताव सादर करावा त्याचप्रमाणे भविष्यकाळात नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या स्थापनेच्या दृष्टीनेही हया मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करावा.

यास अनुसरुन सर्व संबंधीतांना या सूचनांबाबत अवगत करावे ही विनंती.

आपला स्नेहांकित,

(प्र. क. प्रधान)

**डॉ. सुभाष साळुंखे,**
महासंचालक,
आरोग्य सेवा,
मुंबई.

Scanned with CamScanner

अ.शा.पत्र क्र. पीएचसी २००२/८१८/प्र.क्र.४८०/०२/आ.५, दि. २/१२/०३ सोबतचे सहपत्र.

परिशिष्ट -अ.

## प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापना व स्थलांतराबाबत मार्गदर्शक तत्वे

प्राथमिक आरोग्य केंद्राच्या स्थापनेबाबत शासन निर्णय सा.आ.विभाग, क्र. पीएचसी१०९४/४१९९/प्र.क्र.१३/९५/आ-४, दि.१ जानेवारी १९९६ आणि शा.नि.सा.आ.वि. क्र. पीएचसी१०९७/२८६/प्र.क्र.२६/आ-४, दि. २६/१२/९७ अन्वये अनुक्रमे संख्यात्मक व स्थान निर्देशित केलेला बृहत आराखडा मंजूर करण्यात आला आहे. या अंतर्गत नवीन ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करणे, आणि ज्या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रे श्रेणीवर्धित करुन ग्रामीण रुग्णालये स्थापन करण्यांत आली आहेत त्या ठिकाणची प्रा.आ.केंद्रे इतरत्र स्थलांतरीत करण्याबाबत स्थान निश्चिती अंतर्भूत आहे.

या बृहत आराखडयामध्ये १०५ ठिकाणी नव्याने ग्रामीण रुग्णालये स्थापन करण्याबाबत स्थान निश्चिती करण्यांत आली आहे व यापैकी शासन निर्णय सा.आ.वि.क्र. संकीर्ण-१००३/प्र.क्र.१०७/२००३/ आ-४, दि. १४/८/०३ च्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यांत आलेली ३० ग्रामीण रुग्णालये व शासन निर्णय सा.आ.वि.क्र. आरएलएच-१२९९/१५०१/आ-४,दि. १०/१०/०३ अन्वये स्थापन करण्यांत आलेले सोनगीर (जि.धुळे) येथील ग्रामीण रुग्णालय अशी एकूण ३१ ग्रामीण रुग्णालये धरुन ८६ ग्रामीण रुग्णालयांची स्थापना करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत आणि १९ ग्रामीण रुग्णालयांची स्थापना व्हावयाची आहे. या १०५ ग्रामीण रुग्णालयांपैकी ६२ ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रे देखील कार्यरत आहेत आणि त्यांच्या स्थलांतराबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब विचाराधीन होती. अनुशेष व निर्देशांक समितीने प्राथमिक आरोग्य केंद्रांचा जिल्हावार अनुशेष ठरविताना दि.३१.३.९४ रोजी राज्यात अस्तित्वात असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या विचारात घेतली आहे. त्यावेळी प्रस्तुत ६२ ठिकाणची प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच याव्यतिरिक्त अन्य ग्रामीण रुग्णालयांच्या ठिकाणी अजुनही प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यरत असल्यास अशा केंद्रांची संख्या विचारात घेण्यात आली आहे व त्याआधारे अनुशेष ठरविण्यात आला आहे. त्यामुळे अशा ठिकाणी ग्रामीण रुग्णालयाची स्थापना झाल्यानंतर ही प्राथमिक आरोग्य केंद्रे अतिरिक्त ठरत नाहीत किंवा त्यामुळे अनुशेष निर्माण होणार नाही. यास अनुसरुन प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापनेबाबत तसेच स्थलांतराबाबत खालील मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात येत आहेतः-

(क्ष) बृहत आराखडयास मंजूरी देताना मंत्रिमंडळाने खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे विहित केली आहेतः-

(१) प्राथमिक आरोग्य केंद्रे आदिवासी भागामध्ये २०,००० लोकसंख्येसाठी १, डोंगराळ भागात २०,००० लोकसंख्येस १ व बिगर आदिवासी आणि बिगर डोंगराळ भागास ३०,००० लोकसंख्येस १ या प्रमाणात मंजूर करण्यांत यावी.

Scanned with CamScanner

(२) प्राथमिक आरोग्य केंद्राचे ठिकाण निश्चित करतांना त्या गावची लोकसंख्या आदिवासी/डोंगराळ भागात किमान शक्यतो २,००० असावी, बिगर आदिवासी व बिगर डोंगराळ भागात ती शक्यतो ५,००० असावी.

(३) प्राथमिक आरोग्य केंद्र ज्या गांवात स्थापन करण्यात येईल ते ठिकाण त्या प्राथमिक आरोग्य केंद्रास सलग्न असलेल्या उपकेंद्रांना सर्वसाधारणपणे मध्यवर्ती असावे.

(४) प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या स्थापनेची जागा शक्यतो मोफत मिळविण्यात यावी. मध्यवर्ती जागा उपलब्ध होत नसल्यास व जिल्हा परिषदेने तसा ठराव मंजूर केल्यास प्राथमिक आरोग्य केंद्राची जागा शासनाच्या विहित पध्दतीने अधिग्रहीत करावी.

(५) प्राथमिक आरोग्य केंद्र शक्यतो गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी म्हणजे रस्ते, वीज, पाणी व इतर जनतेला उपलब्ध असलेल्या सोईच्या ठिकाणी असावे.

(च) **वरील व्यतिरिक्त इतर सूचना खालीलप्रमाणे आवश्यक आहेत :-**

(अ) संबंधीत जिल्हा नियोजन व विकास मंडळाने स्थान निश्चितीबाबत निश्चिती ठराव पारीत करणे आवश्यक राहील. तथापि असे आदेश पारीत झाले तरी अशा ठिकाणची भौगोलिक स्थिती, त्याची उपयुक्तता, अनुज्ञेयता इत्यादीची पडताळणी महासंचालक स्तरावर करण्यांत यावी.

(ब) ग्रामीण रुग्णालयाच्या ठिकाणची प्राथमिक आरोग्य केंद्रे स्थलांतरीत करताना प्रथमतः त्या ठिकाणची ग्रामीण रुग्णालये पूर्ण सक्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतरच प्राथमिक आरोग्य केंद्रे स्थलांतरीत केली जावीत.

(क) ज्या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रे स्थलांतरीत होणार असतील त्या ठिकाणी ती पूर्ण सक्षमतेने कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने आवश्यक सर्व सुविधा आहेत याची निश्चिती होणे आवश्यक राहील.

(ड) अस्तित्वांत असलेली प्राथमिक आरोग्य केंद्रे स्थलांतरीत होणार असल्यामुळे त्यांच्याकरीता आवश्यक तरतूद वार्षिक अंदाजपत्रकात अंतर्भूत असते. त्यामुळे ह्या स्थलांतरामुळे अतिरिक्त अर्थभार गृहीत धरला जात नाही. म्हणून याकरीता अतिरिक्त तरतूद उपलब्ध होणार नाही. केवळ पदांच्या सुधारित आकृतीबंधानुसार अधीकच्या पदांच्या उपलब्धतेबाबत स्वतंत्रपणे विचार केला जाईल.

(इ) प्राथमिक आरोग्य केंद्रे ~~त्या तालुक्यात~~ स्थलांतरीत होणे आवश्यक आहे.

(फ) अस्तित्वात असलेल्या प्राथमिक केंद्रांमधील पदे, यंत्रसामुग्री व साधनसामुग्रीसहीत प्राथमिक आरोग्य केंद्रांचे स्थलांतर करणे आवश्यक राहील.

-------

Scanned with CamScanner